# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## <u>जाहीर दरपत्रक सुचना तिसरी मुदतवाढ</u>

दि. २४/०२/२०२२

**विषय :–** फोटो तयार करणे कामी सेंथेटीक फ्रेमचे दरपत्रक पाठविणेस बाबत.....

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे नवीन स्वरूपातील श्री.विठ्ठल रुक्मिणी मातेचे चित्रांचे हॉटप्रेस व लॅमिनेशन करूण फोटो तयार करणे कामी आवश्यक असणारे सेंथेटीक फ्रेमचे खरेदी करणे कामी दरपत्रके मागवित आहोत. सदरच्या करावयाच्या पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपलेकडील छापील बिलावर सही व शिक्क्यासह दरपत्रक दि.०४/०३/२०२२ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे. सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

'' सेंथेटीक फ्रेमचा पुरवठा कामाचे दरपत्रक''

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

स्वा/–
**व्यवस्थापक,**
**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

## अटि व शर्ती

१. मंजुर दराने पुरवठादराने मंदिर समितीच्या मागणीप्रमाणे सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्डसह पुरवठा करणे आवश्यक आहे.

२. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणात फ्रेमचा पुरवठा करणे आहे.

३. सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्डसह चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करण्यात येणाऱ्या सिथॅटिक एम.डी.पी. ५एम.एम फ्रेम दर्शन मंडप यथे जागेवर पोहोच करण्याचे आपणास बंधनकारक राहिल.

५.सदर सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्डसह मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस आपणस जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

६. सदर सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्ड खराब असल्याचे आढळून आलेस आपणास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

७.पुरवठा करण्यात आलेल्या सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्डची प्रत व प्रमाण संबधीत विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

८. सदर सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDF बोर्डसह पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च आपणास दिला जाणार नाही.

९.सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१०.सिंथॅटिक फ्रेम 5 mm MDFबोर्डसह पुरवठा वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील. तसेच वाहतुकी मध्ये फ्रेम खराब झालेस त्यासाठी मंदिर समिती जबाबदार राहणार नाही.

११.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपणास बंधनकारक राहील.

१२.सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१३.दरपत्रक मंजूरी आदेशापासून १ वर्ष कालावधीसाठी मंजूर दराने पुरवठा करणेस बंधनकारक राहील.

१४.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस आपणास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१५.प्रशासकीय व अन्य कारणास्तव मंजुर दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अथवा कामामध्ये बदल करणेचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी राखुन ठेवलेला आहे.

१६.आपण रू.१००/–चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करूण देणे आवश्यक आहे.सदरचे प्रतिज्ञापत्र या कार्यालयाकडे जमा केल्याशिवाय पुरवठा कामाची बिले अदा केली जाणार नाहीत.

स्वा/–
कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर,जि.सोलापूर

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## जाहिर दरपत्रक.

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय:— सेंथेटीक फ्रेम मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ गरजेनुसार
पुरवठा करणे कामी निविदा.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.——————————————————————————
पूर्ण पत्ता :— ——————————————————————————

——————————————————————————

मोबाईल क्रं.:— ——————————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे सेंथेटीक फ्रेम मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ गरजेनुसार पुरवठा करणे कामाची दि.२४/०२/२०२२ रोजीचे मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील नोटीस बोर्ड वरील प्रसिध्द झालेल्या जाहीर सुचना तिसरी मुदतवाढ प्रमाणे सेंथेटीक फ्रेम दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | पुरवठा करणे साहीत्याचे प्रकार | कालावधी | प्रमाण | दर रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | २८x४०एम.डी.एफ. ५एम.एम.२इंची फ्रेम | मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ | प्रति नग | |
| २ | २४x३६एम.डी.एफ. ५एम.एम.२इंची फ्रेम | | प्रति नग | |
| ३ | २०x२८एम.डी.एफ. ५एम.एम.२इंची फ्रेम | | प्रति नग | |
| ४ | १८x२४एम.डी.एफ. ५एम.एम.२इंची फ्रेम | | प्रति नग | |
| ५ | १२ x १८एम.डी.एफ. ५एम.एम.१इंची फ्रेम | | प्रति नग | |
| ६ | ९ x १२एम.डी.एफ. ५एम.एम.१इंची फ्रेम | | प्रति नग | |
| ७ | ६ x ८एम.डी.एफ. ५एम.एम.१इंची फ्रेम | | प्रति नग | |

वरील दर प्रत्यक्ष साईज व कंपनीप्रमाणे सेंथेटीक फ्रेमचा सर्व वाहतुक खर्चा सहीत एक वर्षासाठी पुरवठा करणे कामी तसेच सर्व प्रकारचे करासहीत दर आकारण्यात आले आहेत. तसेच सदर दराने मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत करणे त्वरीत पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे सेंथेटीक फ्रेमचा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०२२ सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. शॉप ॲक्ट लायसन्स / नोंदणी परवाना.
२. पॅन कार्ड.
३. जीएसटी प्रमाणपत्र अन्यथा कर आकरणी उत्पन प्रमाणपत्र ( इनकमटॅक्स प्रमाणपत्र )